# हिंदू व भारतीय राष्ट्रवाद

हिंदू राष्ट्रवाद व भारतीय राष्ट्रवाद हा काही वादाचा नविन मुद्दा नाही आहे. ब्रिटीश काळातच उदयाला आलेल्या आपल्या स्वातंत्र्यलढयात भारतीय राष्ट्रवादाची कल्पना व मूल्ये यांची नांगरणी चालू होती. जे हिंदू जातीयवादी शक्ती स्वतास स्वातंत्र्यलढ्यापासून लांब ठेवत होते. त्यानी हिंदू राष्ट्रवाद ही नवीन कल्पना जन्मास घातली. हा मुद्दा पुन्हा एकदा भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे नेते नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा ऐरणीवर आणला जुलै २०१३ मधील एका मुलाखतीत त्यानी सांगितले की ते जन्माने हिंदू आहेत व राष्ट्रवादी आहेत म्हणून ते हिंदू राष्ट्रवादी आहेत. भाजपाचे पक्षाध्यक्ष राजनाथसिंह यांनी मोदींची री ओढत पुढे सांगितले की या देशातील मुस्लीम हे मुस्लीम राष्ट्रवादी आहेत. व ख्रिश्चन हे ख्रिश्चन राष्ट्रवादी आहेत म्हणजेच प्रत्येक धर्माचा राष्ट्रवाद वेगळा आहे. आणि प्रत्येकाला त्याची निवड करण्याचे स्वातंत्र्य आहे.

मोदींचे जन्म आणि राष्ट्रवाद यांची कुंडली जुळवण्याचे तर्कशास्त्र अजब आहे. ही एक प्रकारची धूळफेक आहे. हिंदू राष्ट्रवाद हे विशिष्ट विचारसरणीचे प्रतिनिधीत्व करणारे राजकारण आहे. ही मोदींच्या पक्षाच्या पालक संघटनेच्या कडव्या हिंदुत्ववादी विचारसरणीचे अपत्य आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात उद्योजक, व्यावसायिक, कारागीर, आणि नव्याने तयार होत असलेला सुशिक्षीत वर्ग हा एकत्र येत होता आणि आपल्या मागण्यांसाठी छोट्या छोट्या संघटना स्थापन करत होता. (उदा. मद्रास महाजन सभा, सार्वजनीक सभा बॉम्बे असोसिएशन ई. ) या संघटनाना एका राजकीय व्यासापिठाची गरज भासली व १८८५ साली भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसचा जन्म झाला. याउलट समाजातील अस्तंगत होणारया वर्गाने ज्यामध्ये हिंदू व मुस्लीम जमीनदार, संस्थानिक यांचा समावेश होता यांनी एकत्र येण्याचे ठरवले व कॉग्रेसच्या सर्वसमावेशक धोरणाला विरोध करण्याचे ठरवले. या वर्गाच्या हातून सामाजिक बदलामुळे सूत्रे सुटत चालली होती व त्यामुळे ते भयभीत झाले होते. यासाठी या वर्गाने धर्म संकटात आहे अशी भूमिका घेतली. यआ वर्गाला कॉग्रेसचे ब्रिटीशांना आव्हान देणे पसंद नव्हते. तोपर्यंत कॉग्रेसने समाजातील वेगवेगळ्या वर्गाच्या मागण्या पुढे ठेवण्यास सुरुवात केली होती, ज्या एका अर्थाने नव्याने उदयास येत असलेल्या भारताच्या मागण्या होत्या. तत्कालीन कॉग्रेसने नेहमीच या देशाकडे ‘एक बांधणी होत असलेले राष्ट्र’ या नजरेने पाहिले.

तत्कालीन भारतातील सामंतवादी विचारसरणीला ब्रिटीश साम्राज्यसत्तेला आव्हान देणे, त्यांच्यासमोर मान न तुकवणे, हे मान्य नव्हते. जणू काही हा धर्मद्रोह होता. याउलट ब्रिटीश साम्राज्याला निष्टा अर्पण करणे ही धर्माची मुख्य शिकवणूक होती. या वर्गाचे प्रतिनिधी एकत्र आले. आणि त्यानी ‘युनाईटेड इंडीया patriotic असोसिएशन १८८८ साली स्थापन केली. यामध्ये पुढाकार प्रामुख्याने ढाक्याचा नवाब आणि काशीचा राजा यांचा होता. ब्रिटिशांच्या प्रभावामुळे यातून मुस्लीम जमीनदार व नवाब बाहेर पडले. आणि त्यानी १९०६ साली मुस्लीम लीग स्थापन केली. त्याच बरोबर हिंदू राजेराजवाड्यांच्या प्रतीनिधीनी १९०९ साली पंजाब हिंदू सभा व १९१५ साली हिंदू महासभा स्थापन केली. यामधील सहभागी लोकांनी हिंदुत्वाचे राजकीय तत्वज्ञान जन्माला घातले. या विचारसरणीचा मुख्य आरसा म्हणजे सावराकारांचे १९२३ सालचे पुस्तक ‘हिंदुत्व’ हे होय. ही अर्थात ब्रिटिशांसाठी राष्ट्रवादी चळवळ कमकुवत करण्याची

सुवर्णसंधी होती. त्यानी एका बाजूला मुस्लीम लीगला छुपा पाठींबा दिला आणि दुसऱ्या बाजूला हिंदू महासभेला कुरवाळायला सुरुवात केली.

हिंदुत्वाच्या विचारसरणीची कास धरून १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पुढे आला. त्यांचे ध्येय हिंदुराष्ट्र आणि मार्ग हिंदू राष्ट्रवाद असा होता. भारतीय राजकारणातील मध्यमवर्गीयांच्या आशाआकांक्षाचे प्रतिबिंब भगतसिंग, आंबेडकर, गांधी, मौ. आझाद, या व यांच्यासारख्या स्वातंत्र्यसंग्रामात व सामाजिक परिवर्तनाच्या लढाईत अग्रेसर असणाऱ्या व्यक्तीमत्वात सापडते.

त्यानी भारतीय राष्ट्रवादाचा पाया स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यावर रचला. मुस्लीम लीगने मुस्लीम राष्ट्रवादाच्या विचारसरणीची पाठराखण सुरु केली होती जीने लिंग व जाती यांच्यावर आधारीत विषमतेच्या विचाराचा अलगद स्वीकार केला होता. याउलट संघ व हिंदू महासभा मनुस्मृतीसारख्या विषमतेला आधारभूत ग्रंथाचा पुरस्कार करत होत्या. यामुळे हिंदू व मुस्लीम जातीयवादी संघटना स्वातंत्र्यलढ्यापासून लांबच राहिल्या. कारण स्वातंत्र्यसंग्रामाचे ध्येय हे हे लोकशाहीवादी व निधर्मी प्रजासत्ताकाचे होते. काही सन्मानीय अपवाद वगळता हिंदू व मुस्लीम जातीयवादी आपल्या पूर्वजांची स्तुतीस्तोत्रे गाण्यात मग्न होते आणि ब्रिटीशांच्या विरोधातील लढ्यापासून लांबच ठेवले होते.

गांधीजींचा बहुजनांना या स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी करण्याचा प्रयत्न हा ऐक मोठा टप्पा ठरला. यामुळे जीनासारखे घटनात्मक राजकारणाचे पुरस्कर्ते व हिंदू- मुस्लीमातील परंपरावादी स्वातंत्र्यलढ्यापासून दुरावत गेले. १९२० नंतर हिंदू महासभेच्या राजकारणाची दिशा निश्चित आहे. मुस्लीम राष्ट्रवादाचा विरोध करायचा व ब्रिटीशांचा अनुनय करायचा. मुस्लीम लीगसुद्धा हेच करायची पण त्यांचा रोख कॉंग्रेसवरती असायचा कारण ते कोन्ग्रेसला हिंदूंचा पक्ष मानायचे. भारताच्या स्वातंत्र्यानंतर व फाळणीमुळे मुस्लीम लीगच्या समर्थकांना देश सोडण्यावाचून पर्याय नाही राहिला. परंतु भारतात राहिलेल्या मुस्लीम समुदायामध्ये जातीयवादी विचारांची मुळे राहिलीच. तर हिंदू जातीयवादी संघटनांनी हळूहळू पाय पसरायला सुरुवात केली. याची सुरुवात राष्टपिता महात्मा गांधी यांच्या हत्येने झाली. जे या हिंदू धर्माचे सर्वोत्कृष्ट प्रतिक होते. हिंदू राष्ट्रवाद्यानी प्रथम जनसंघाची स्थापना केली. ज्याचे रुपांतर पुढे भाजपामध्ये झाले. त्यांचे मुख्य मुद्दे सहकारीकरणाला व सार्वजनिक उद्योगांना विरोध हेच होते. शिवाय मुस्लिमांच्या राष्ट्रवादाचा मोठा मुद्दा त्यानी उपस्थित केला.

समाजाच्या भावनिक मुद्यांना हात घालणारे कार्यक्रम हीच या पक्षाची शिदोरी होती. गोमाता, राममंदिर, रामसेतू, ३७० कलम, समान नागरी कायदा हाच या पक्षान्चा पाया आहे. खूप लोक हे विसरून जातात की अनेकदा जातीयवादी हिंसाचाराची कारणे ही समाजात द्वेष पसरावणाऱ्या प्रवृतीत दडलेली असतात. आणि समाजात जातीधर्मावर दुही तयार करणे याच कार्यक्रमामुळे जातीयावादि पक्ष सत्तेत येऊ शकतात.

गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी लोकशाहीमुळेच समाजात दुही माजते असे ही एक चमत्कारिक वाक्य बोलले. हे सपशेल चुकीचे आहे. लोकशाहीमुळे समाजाचे सामाजिक व राजकीय विकासाच्या मुद्यावर ध्रुवीकरण होते. याचे उदाहरण म्हणजे अमेरीकेमध्ये अमेरिकन समाजाचे रिपब्लिकन आणि आणि democrats या दोन पक्षामुळे होणारे ध्रुवीकरण. लोकशाहीत निवडणुकीमुळे होणारी अशी घुसळण लोकशाहीला बळकट करते. परंतू हिंदू किंवा मुस्लीम राष्ट्रावादाचा मुद्दा निवडणुकीत मांडणे म्हणजे धर्माच्या आधारावर ध्रुवीकरण होणे. यामुळे आपल्या राज्यघटनेला व

लोकशाहीला धक्का पोहोचतो. लोकशाहीचा मूळ हेतू हा नागरिकानी धर्म भाषा, जात, प्रांत या पलीकडे जाऊन देशाचा विचार करावा हा असतो.

नरेंद्र मोदी स्वतः संघाचे निष्ठावंत प्रचारक आहेत. त्यानी ही गोष्ट लपवून ठेवली आहे की भारतीय लोकानी धर्माच्या आधारावर राष्ट्रवादाला खूप आधीच नकार दिला आहे. राष्ट्रपिता म. गांधी हे वैयक्तिक जीवनात रूढ अर्थाने हिंदू होते परंतु कधीही हिंदू राष्ट्रवादी नव्हते. मौलाना आझाद हे मुस्लीम होते परंतु मुस्लीम राष्ट्रवादी नव्हते. स्वातंत्र्याच्या चळवळीत विविध जातीधर्माच्या लोकांनी भाग घेतला परंतु सर्वानी आपापल्या जातीधर्माच्या पलीकडे जाऊन देशाच्या स्वातंत्र्याची मागणी केली. अजूनही लोक आपले राष्ट्रीयत्व हे भारतिय आहे असे समजतात. त्यामागे जात/धर्म चिटकवत नाहीत.

हिंदु राष्ट्रवाद्यांना राममंदिर हवे आहे तर भारतीयांना शाळा, विद्यापीठ आणि रोजगाराची गरज आहे. हिंदू किंवा कोणताही धर्माच्या आधारावरील राष्ट्रवाद धर्मात तेढ माजवतो तर भारतीय राष्ट्रवाद सर्वांना सामावून घेतो. भारतीय राष्ट्रवादाची मुळे आपल्या सर्वसमावेशक संस्कृतीत आहेत तर हिंदू राष्ट्रवाद हा संकुचित अस्मितेच्या गर्तेत पडला आहे. हिंदू राष्ट्रावादात समाजातील तळागाळाच्या लोकांच्या प्रश्नाना बिलकुल स्थान नाही. भारतीय राष्ट्रवाद हा आपल्या स्वातन्त्र्यासंग्रमातून उदयाला आलेला आहे. त्याला भारतीय उपखंडात भारतामध्ये हिंदू राष्ट्वादाकडून, पाकिस्थानात मुस्लीम आणि श्रीलंकेमध्ये बौद्ध (सिंहली) राष्ट्रवादाकडून आव्हान मिळत आहे.

हे इतिहासाचे तमोयुग आहे. ज्यामध्ये धार्मिक विद्वेषाला  राजकारणात स्थान मिळाले आहे. जगातील अनेक देशात असे घडत आहे. आशा करूयात की भारतात जनता धार्मिक राष्ट्रवादाची आणि भारतीय राष्ट्रवादाची गल्लत करणार नाही.